संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# संघ शताब्दीतली शतरंजी चाल

**प्रयाग** येथे भरलेला अर्धकुंभमेळा मार्चच्या पहिल्या आठवड्यात संपत असताना निवडणूक आयोगाकडून राजकीय कुंभमेळ्याची घोषणा होईल. त्यात आपापल्या शक्तीप्रदर्शनाची तयारी अनेक राजकीय आखाडे करीत आहेतच. परंतु सत्ताधारी भारतीय जनता पार्टीचे पालकत्व असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांच्या राजकीय आखाड्यालाही एक पर्याय आताच देऊन ठेवला आहे. आताच्या या प्रयाग कुंभमेळ्यामध्ये सहभागी झालेले संघाचे सहकार्यवाह भैय्याजी जोशी यांनी २०२५ पर्यंत राम मंदिर बांधले जावे. असा इशारे वजा आदेशच देऊन टाकला. १९५२ मध्ये सोमनाथ मंदिराचे बांधकाम झाले आणि देशाची प्रगती झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. तिथे राममंदिर झाले तर देशाची आणखीन वेगाने प्रगती होईल. असा प्रगतीचा मंदिर मापदंडही त्यांनी घोषित केला. खरे तर सध्या राम मंदिरापेक्षाही २०१९ ची लोकसभा निवडणूक भाजपा आणि संघासाठी अत्यंत महत्वाची ठरते. कदाचित म्हणूनच संघाने आता राममंदिरासाठी २०२५ पर्यंतची मुदत वाढवलेली दिसते. २०२५ च का हे ५२ च्या उलट २५ असा त्याचा अर्थ नसून २०२५ ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेची शंभर वर्ष पूर्ण होतात आणि म्हणून संघाच्या शताब्दी वर्षामध्ये राम मंदिराचे भव्य निर्माण किंवा रामाची पुर्नप्राणप्रतिष्ठा असा मोठा योग जुळवून आणण्याचा मोठा अजेंडा त्यामागे स्वच्छपणे दिसतो. गेल्याच महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने राम मंदिराची सुनावणी इतक्या तातडीने करण्याची गरज नसल्याचा अभिप्राय दिला होता त्याविरोधात संतप्त झालेल्या संघ परिवाराने देशभर हुंकार सभा आयोजित केल्या आणि राम मंदिरासाठी अध्यादेश काढण्याची मागणी केली. तसे न केल्यास पुन्हा देशभर प्रचंड मोठे आंदोलन करण्याचा इशाराही दिला गेला होता. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदींनी न्यायालयाच्या निर्णयाचाच सन्मान करण्याची भूमिका घेतली. एवढेच नव्हे तर अध्यादेश काढला जाणार नाही हेही त्यांनी स्पष्ट शब्दात ऐकवले होते त्यानंतर संघ परिवार थोडा नरम पडलेला दिसतो आणि आता २०२५ चा मुहूर्त साधत असतानाच संघाने आपल्या शताब्दीची नवी शतरंजी चाल आखलेली स्पष्टपणे दिसून येते.

### विरोधी पक्षाचे आव्हान

संघाने राममंदिर बांधण्यासाठी केलेली ही मुदतवाढ केवळ संघासाठीच नव्हे तर सगळ्या देशासाठीच महत्वाची ठरते. कारण सध्या भारतीय मतदारांचे लक्ष हे २०१९ च्या निवडणुकीकडे लागलेले आहे. नाही म्हटले तरी २०१४ च्या मोदी लाटेला मोठे आव्हान उभे करण्यामध्ये काँग्रेस आणि इतर विरोधी पक्ष यशस्वी झालेले दिसून येतात. परिणामी यावेळची निवडणूक ही २०१४ पेक्षाही अधिक चुरशीची ठरणार आहे. २०१४ ला काँग्रेसच्या कारभाराला लोक कंटाळले होते आणि त्यांना बदल हवा होता. त्या बदलानंतर नव्या मोदी सरकारने केलेल्या कामाचा लोकांनी अनुभव घेतला आहे. आणि आता खऱ्या अर्थाने मोदी सरकारच्या कसोटीचा हा कालावधी म्हणावा लागेल. भारतीय राजकारणाच्या इतिहासात काँग्रेसला पर्याय ठरू शकणाऱ्या एकाच पक्षाचे काम समोर आहे. परंतु एकूण राजकारणाच्या कार्यपध्दतीला छेद देऊन लोकांमध्ये विश्वास निर्माण करणारा पक्ष म्हणून लोकांनी भाजपाला पसंती दिली होती. मात्र ज्याप्रमाणात अपेक्षा पूर्ण व्हायला हवी होती तेवढी झालेली नाही. म्हणून भारतीय मतदार पुन्हा एकदा अशा एका चौफुलीवर येऊन पोहचला आहे की, त्याला यावेळी अतिशय काळजीपूर्वक मतदान करावे लागेल. अशा एका संभ्रमावस्थेत तो असताना राम मंदिरासारखा मुद्दा उपस्थित करून त्यात भर घालण्याचेच काम होणार होते. ही वस्तुस्थिती जर लक्षात आली असेल तर राम मंदिराची मुदत वाढवण्याचा संघाचा विचार एकाअर्थी योग्य ठरतो. कारण कोणत्याही देशाच्या राजकीय जीवनामध्ये कोणतीही निवडणूक ही त्या राष्ट्राच्या भवितव्याशीच निगडीत असते. हे सत्य समजून घेऊन खरे तर राम मंदिराचा मुद्दादेखील उपस्थित करणे गैरलागूच होते. अचानकपणे आणि तेही लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर हा मुद्दा पुढे आणला गेला. त्यामागचे नेमके प्रयोजन काय असा प्रश्न उपस्थित होतो. केवळ दबाव निर्माण करणे आणि पुढच्या पाच सहा वर्षामध्ये राममंदिराचे उद्दीष्ट पूर्ण करणे हा त्यामागचा हेतूही समजून घेता येऊ शकतो. परंतु निवडणुकीच्या तोंडावर तो पुढे आणल्याने त्याचा सर्वाधिक फटका सत्ताधारी पक्षालाच बसू शकतो. कारण गेल्या तीन वर्षात या विषयी कोणीही फारसे बोलत नव्हते. देशाचा विकास, प्रगती, या गोष्टींनाच महत्व दिले जात होते.

### मोदींच्या काळातील प्रगतीचे काय ?

खरे तर संघानेदेखील गेल्या दोन वर्षामध्ये अनेक वादग्रस्त मुद्दे बाजूला ठेवले होते आणि आपापसातील संवादावर भर देऊन स्वतःसाठी आणि भाजपासाठी अनुकूल वातावरण तयार केले जात होते. या संवादांच्या कार्यक्रमांमध्येसुध्दा राम मंदिरासाठी संघ परिवार निवडणुकीच्या तोंडावर इतका उतावीळ होईल असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र निवडणुकीची धामधूम सुरु होण्यापूर्वी राम मंदिर बांधकामाचीही लगबग सुरू केली जाणे अनेकांना आश्चर्यचकित करणारे ठरले. कदाचित देशभरातील लोकांच्या प्रतिक्रिया संबंधितांच्या कानापर्यंत पोहचल्या असाव्यात किंबहुना पुढच्या सहा महिन्यामध्ये देशभरातल्या एकूण घटनाक्रमाचा प्राधान्यक्रमही लक्षात आला असावा. म्हणून हा बदल झालेला दिसतो.अर्थातच राम मंदिराच्या मागणीचा आग्रह कायम ठेवला जाईल. आणि प्रत्यक्ष २०२५ ला राममंदिर उभे राहिलेले असेल अशी एकंदरीत संघ परिवाराची व्यूहरचना दिसून येते. बुध्दीबळातल्या डावाप्रमाणे एकेक चाल खेळत आपल्याच पक्षाच्या राजाला किंवा वजिराला चेकमेट देण्याचा म्हणजे २०२५ पर्यंत राममंदिर अस्तित्वात आणण्याचा हेतू स्पष्टपणे दिसतो. सोमनाथ मंदिराच्या निर्मितीनंतर देशाची प्रगती झाली असे संघ परिवाराला वाटणे हीदेखील आश्चर्याचीच गोष्ट ठरते. पण मग मोदींचे सरकार आल्यानंतर अपेक्षित प्रगती झालेली नाहीच. आणि मग राम मंदिर हवे आहे. असा त्याचा अर्थ निघू शकतो.